नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०५/२०२५ (शनिवार)**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन मौदा ची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा**:—दिनांक ०३/०५/२०२५ रोजी १६:४५ ते १७:३० वाजता दराम्यान पो. स्टे. मौदा येथील पोलीस स्टॉफ पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एक पांढ—या रंगाचा कॅबीन व निळया रंगाचा डाला असलेला १२ चक्का ट्रक क्र. **एम.एच.४०सी.वी. १०१०** हा गौण खनिज रेती ची चोरटी वाहतूक करून भंडाऱ्या कडून नागपूर कडे जात असल्याची माहिती मिळाल्याने मौदा पोलीसांनी मौजा महादुला फाटा शिवार येथे नाकाबंदी केली असता मिळालेल्या गुप्त माहितीनुसार १२ चक्का ट्रक क्रमांक **एम.एच.४० सी.वी. १०१०** हा मिळून आल्याने ट्रक ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक **आरोपी नामे महेश राजु मेश्राम वय २६ वर्ष रा गांधी वार्ड निहारवानी रोड पेट्रोलपंप ठाणा ता. जि. भंडारा** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच तो स्वतःच गाडीचा चालक व मालक असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** १२ चक्का ट्रक क्र. **एम.एच.४० सी.वी. १०१०** किमती ३५,००,०००/रूपये **व २)** १० ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण ३५,३०,०००/रूपयेचा माल जप्त करून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. ट्रक चालक आरोपी नामे **आरोपी नामे महेश राजु मेश्राम वय २६ वर्ष रा गांधी वार्ड निहारवानी रोड पेट्रोलपंप ठाणा ता. जि. भंडारा याच्या** विरूध्द पोस्टे मौदा येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे**

**नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड ची कारवाई

**पोलीस स्टेशन उमरेड**:—दिनांक ०३/०५/२०२५ रोजी ०१:१५ ते ०१:४० वाजता दराम्यान पो. स्टे. उमरेड येथील पोलीस स्टॉफ पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एक टाटा कंपनीचा एल.पी. १४ चक्का ट्रक क्र. एम.एच. ४९ ए.टी. ९६५९ हा गौण खनिज रेती ची चोरटी वाहतूक करून भिवापूर कडून उमरेड कडे येत असल्याची माहिती मिळाल्याने उमरेड पोलीसांनी बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करून सदर टाटा कंपनीचा संशयीत एल.पी. १४ चक्का ट्रक क्र. **एम.एच. ४९ ए.टी. ९६५९** दिसून आल्याने चालकाला ट्रक थांबविण्याचा इशारा केला असता सदर चालक याने बायपास चौक च्या मधोमध ट्रक उभे करून वाहनातून खाली उतरून पळून जात असता त्याचे पोलीसांनी पाठलाग केला परंतू सदर चालकाने ट्रक चाबी घटनास्थळावरच फेकून तिथून पळून गेला, सदर ट्रक पाहणी केली असता ट्रक च्या डाल्यामध्ये गौन खनीज रेती दिसून आली, त्यामुळे वाहन चालक आरोपीने विनापरवाना अवैध्यरीत्या शासनाच्या गौन खनिजाचे रेती चे उतखनन करून चोरून आनल्याचे निष्पण होत असल्याने तसेच त्याने वाहन सार्वजनिक रोडच्या मध्यभागी उभा करुन जनतेला त्रास होईल अश्या प्रकारे उभा करुन पळून गेल्याने पोलीसांनी पंचासमक्ष १) टाटा कंपनीचा एल.पी. १४ चक्का ट्रक क्र. **एम.एच. ४९ ए.टी. ९६५९ कि. ३०,००००० रु व २) ट्रक च्या डाल्यामधील १० ब्रॉस रेती कि. ५०,००० रु. असा एकूण ३०,५०,००० रु. चा मूददेमाल ताब्यात घेवून घटनास्थळावरून पळून गेलेल्या आरोपीविरूध्द कलम ३०३(२), २८५ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधि. १९६६ सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम**

**१९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीताविरूध्द पो.स्टे. रामटेक ची कारवाई ( एक आरोपी अटक, एकूण किं. ४,०५,०००/— रू. मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन रामटेक** :—दिनांक ०२/०५/२०२५ रोजी पो.स्टे. रामटेक येथील पोलीस स्टॉफ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली मौजा तुमसर कडून रामटेक कडे येणारी **बोलेरो पिकअप क्रं. एम.एच. २८ बी.बी. ४५३९** मध्ये कत्तलीकरीता अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **मौजा चिचाळा** येथे नाकाबंदि करून संशयीत बोलोरो पिकअप क्रं. **एम.एच. २८ बी. बी. ४५३९** ला थांबवून वाहन चालकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव शेख सलमान शेख बशीर वय ३२ वर्ष रा. भाजीमंडी कामठी जि.नागपुर शहर असे सांगितले. त्याला वाहनात काय आहे? असे विचारले असता तो उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **१७ गोवंश जनावरे** (४ गायी आणि १३ वासरू) असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलोरो पिकअप एम.एच. २८ बी.बी. ४५३९ किंमती ३,००,०००/— रू. व १७ गोवंश जनावरे किंमती १,०५,००० /— रू. असा एकूण किंमती ४,०५,०००/— रू. मुददेमाल जप्त केला करून** वाहन चालक/मालक आरोपी नामे **शेख सलमान शेख बशीर वय ३२ वर्ष रा. भाजीमंडी कामठी जि.नागपुर शहर** याच्या विरूध्द **कलम ११(१)(डी) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५अ(१),९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम १८३,१८४,६६,१९२,१८१(३),५,१८० मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.** पुढील तपास रामटेक पोलीस करित आहेत.

## अवैधरित्या देशी , मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

## एकूण ४ आरोपीविरूध्द ४ गुन्हे नोंद. एकूण ११,७५० /— रू. चा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०२/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. कन्हान हद्दीतील मौजा **घाडेघाट कन्हान ता. पारशिवनी व पिपरी कन्हान** या दोन ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे अवैधरित्या देशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपींवर छापा टाकूण एकूण कि. १०५०/— रू. ची देशी दारू संत्रा जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपी नामे १) राजन नामदेव कोथरे वय ५७ वर्ष रा.घाडेघाट ता. पारशिवनी जि. नागपुर व २) शुभम अमोल भालाधरे वय २० वर्षे रा. पिपरी कन्हान असे एकूण **२ आरोपींविरूध्द २ गुन्हे दाखल केले आहे.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०२/०४/२०२५ रोजी **पो.स्टे. कळमेश्वर** येथील पोलीस स्टॉफ ने **मौजा फेटरी** येथे अवैधरित्या देशी दारू भिंगी विक्री करणारा आरोपी नामे **उज्वल अर्जुन भलावी वय २० वर्ष रा. वार्ड क्र ०३ फेटरी** याचे वर छापा टाकून त्याचे कडून किंमती ७००/— रू. ची देशी भिंग्री दारू जप्त करून आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०२/०४/२०२५ रोजी **स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पो.स्टे. रामटेक हद्दीतील मौजा **महादुला ते घोगरा रोच्या बाजुच्या जंगल परिसरात** अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **अरविंद परतेती वय ४५ वर्ष रा. महादुला ता. रामटेक** याचे वर छापा टाकून त्याचे कडून किंमती १०,०००/— रू. ची मोहफुलांची गावठी दारू जप्त करून आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे एकूण ०४ आरोपीविरूध्द ०४ गुन्हे नोंद व एकूण ११,७५० /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने